# फुगे घ्या फुगे फेम अण्णा सुरवाडे यांची बोदवड महाविद्यालयात धमाल

(06.09.2019) “ व मनी माय बबल्या इकस केसांवर फुगे “ या गाण्यावर बोदवड महाविद्यालयाच्या विद्यार्थी विद्यार्थीनींनी धमाल ताल धरून गायक श्री अण्णा सुरवाडे यांना दाद दिली

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड येथे सांस्कृतिक विभागाच्या वतीने सास्कृतिक कार्यक्रमाचे उदघाटन प्रसिद्ध अलबम फेम गितलेखक व गायक श्री अण्णा सुरवाडे याचे हस्ते दि 6 सप्टेंबर 2019 रोजी महाविद्यालयात सपन्न झाले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्‌य अरविद चौधरी होते तर व्यासपीठावर उपप्राचार्य डी एस पाटील सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ अनिल बारी,प्रा अजय पाटील,प्रा कांचन दमाडे डॉ वंदना बडगुजर हे उपस्थित होते या प्रसंगी प्राचार्य चौधरी यांनी श्री सुरवाडे याच्या गायन क्षेत्रातील खडतर प्रवासाचा व त्याच्या महाविद्यालयातील कलागुणांचा परिचय विद्यार्थ्याना करून दिला व महाविद्यायांच्या वतीने सत्कार केला सदर कार्यक्रमासाठी डॉ अनिल बारी , प्रा अजय पाटील प्रा कांचन दमाडे, डॉ वंदना बडगुजर यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाला विद्यार्थीनींनी उस्फूर्त प्रतिसाद दिला





